# प्रथा - काही उपआख्याने

**- चन्द्रशेखर पुरन्दरे**

*(प्रत्येक 'तो' वेगळा आहे.)*

तो पुण्याजवळच्या एका खेड्यातला मुलगा. एक थोरला भाऊ आणि एक धाकटी बहीण. आजोबा मोठे वकील होते. वडील शिकले नाहीत. काही नोकरीधंदाही केला नाही. ते रोज सकाळी घागरी घेऊन गावातल्या देवांना पाणी घालत. इतर वेळ सतत बिड्या फुंकत. हा आयुष्यभराचा उद्योग. पिढीजात शेती होती. त्या थोड्याफार अनियमित उत्पन्नावर घर चालत असे. प्रथेप्रमाणे धाकटा मुलगा आईचा लाडका होता. तिला थोरला आवडत नसे. प्रथेप्रमाणे त्याचे त्याला आयुष्यभर दुःख होते.

थोरला प्रथेप्रमाणे व्यवस्थित शिकला. शालान्त परीक्षेनंतर पुण्याला आला. तेथे कॉलेजही केले, घरच्या गरिबीमुळे लगेचच सरकारी नोकरीला लागला. नंतर आजोबांसारखा वकिलीची परीक्षा पास झाला; पण आर्थिक परिस्थितीमुळे नोकरी सोडणे शक्य नव्हते. निवृत्त होईपर्यंत वकिली करू शकला नाही. यथावकाश लग्न केले, यथावकाश एक मुलगा झाला. स्वस्त भाड्याच्या दोन खोल्या जुन्या पुण्यात घेतल्या. ते घर '६२च्या पानशेतच्या पुरात वाहून गेले, मग सासऱ्यांनी या कुटुंबाला त्यांच्या एक वाड्यात आश्रय दिला. यथावकाश आणखी एक मुलगीही झाली.

धाकटा शिकला नाही. जेमतेम शालान्त परीक्षा तिसऱ्या खेपेला पास झाल्यावर थोरल्या भावाने त्याला पुण्याला आणला व प्रथेप्रमाणे आपल्या घरी ठेवला. यथावकाश त्याला जिल्हा परिषदेत नोकरी लावून दिली. धाकट्याचे नोकरीत नीट जमत नसे. त्याचा दिनक्रम म्हणजे घरातून निघायचे, बसने ऑफिसच्या जवळ उतरायचे आणि तिथल्या सार्वजनिक बागेत दिवसभर बसायचे.

ही अनुपस्थिती आणि जेव्हा केव्हा नोकरीवर हजर होई, तेव्हाची अकार्यक्षमता यामुळे नोकरी धोक्यात येऊ लागली. सुरुवातीच्या अव्वल कारकुनाच्या पदावरून त्याची अवनती करत करत शेवटी त्याला सगळ्यात खालच्या पदावर नेमले गेले. तेथे त्याचे काम म्हणजे ऑफिसातून बाहेर जाणाऱ्या प्रत्येक पत्राची रजिस्टरमध्ये नोंद ठेवणे.

हेही काम त्याला आळशीपणामुळे जमत नसे. टेबलावर बसून तो समोरचा कागदांचा ढीग तासन् तास अक्षरशः फक्त बघत असे. त्यांना हातही लावत नसे. त्यात त्याला तापदायक म्हणजे ऑफिसच्या परीक्षा आवश्यक असत. काही परीक्षांमध्ये उत्तराचे पुस्तक जवळ ठेवायची सवलत होती. तुम्ही फक्त ते पान उघडून उत्तर कॉपी करायचे. तरी प्रत्येक परीक्षेत तो नापास होई. अखेर त्याला काढून टाकणार असे ऑफिसने सांगितले. ही कारवाई सरकारी खात्यात अगदीच विरळा. त्यावरून त्याच्या कामाचा अंदाज यावा.

अधिक खोलात जाता वेळ 'काढणे' ही संकल्पना त्याला नव्हती. प्रथेप्रमाणे बहुतेक लोकांत ती असते. म्हणून मोकळ्या वेळात 'काय करू' हा प्रश्न लोकांना सतावतो. रोजच्या रोटीची काळजी असेल तर तो प्रश्न उद्भवतच नाही. ऊठ आणि रोटी मिळव. महाराष्ट्रातल्या ऊस कामगार महिलांची वेठबिगारी किंवा नोकरी किंवा व्यवसाय किंवा चळवळ किंवा आजारपण किंवा व्यसन किंवा पूजा-अर्चा किंवा एखादा छंद हा प्रश्न सोडवतात. काय करायचे हे आखून दिलेले असते. वस्तुतः या माणसाला भाऊ नसता तर रोजीरोटी हा प्रॉब्लेम असता;

पण त्याकडे त्याचे संपूर्ण दुर्लक्ष असे.

ऑफिसची वेळ संपली की ऑफिसला गेलेला असो किंवा नसो, तो घरी यायचा आणि लगेचच देवदर्शनाला बाहेर पडायचा. जवळ एक-दोन देवळे होती. तेथे जाऊन काही तास बसायचा. मग घरी येऊन जेवण. दिवस संपला.

त्याला प्रथेप्रमाणे ऐदी, आळशी, भावाच्या जीवावर ऐतखाऊ, बेजबाबदार, मंदबुद्धी, निष्क्रिय असे म्हणता येईल. दुसऱ्या दृष्टीने हा काळाचा पराभव होता. योग होता. दैनंदिन जगण्यापासून ही विरक्ती होती. 'आम्ही काय कोणाचे खातो, तो राम आम्हांला देतो' अशी ही वृत्ती होती. त्या वृत्तीला सामाजिक जाणीवच अप्रस्तुत होती. मग नोकरी करा, पैसा मिळवा, उदरनिर्वाह करा, लग्न करा, मुले जन्माला घाला, त्यापुढे जाऊन जगासाठी काहीतरी भले करा. या मितीला अर्थच राहात नाही. त्याचा वेळ त्याचा तो जात असे. त्याने स्वतःहून काही करायची त्याला कधीही जरूरी भासली नाही. कारण त्याला वेळाची पोकळीच जाणवत नसे.

तरीही नोकरी जायची शक्यता निर्माण झाल्यावर थोरला भाऊ हादरला. त्याने आधी पुण्यातल्या जिल्हा परिषदेच्या ऑफिसमध्ये वरिष्ठांना भेटून रदबदलीचा बराच प्रयत्न केला. रदबदली म्हणजे विनवण्या. तो स्वतः ज्येष्ठ सरकारी नोकर असल्याने त्याच्या शब्दाला जरा वजन होते. भावाला आणखी काही काळ नोकरीवर ठेवायला मंजुरी मिळाली. मात्र ऑफिसच्या परीक्षा पास व्हाव्या लागतील असे वरिष्ठांनी बजावले. ते आश्वासन घेऊन आताचा प्रश्न तर सुटला असे म्हणून भावाने सुस्कारा टाकला. त्याचे खरे काम आता सुरू झाले. या माणसाला नोकरी टिकवण्यासाठी म्हणजे परीक्षा देण्यासाठी उद्युक्त करणे. ते अवघड होते. अवघड म्हणजे अशक्य आहे हे थोरल्याच्या लवकरच लक्षात आले. मग त्याने परीक्षा टाळून याला नोकरीवर ठेवता येईल का याची चाचपणी सुरू केली. सरकारी नोकरशाहीत ओळखी असल्याने त्याला एक सल्ला देण्यात आला - मुख्यमंत्र्यांचा दबाव आला तर पुण्यातील ऑफिस नियमाला वळसा घालू शकेल. थोरला त्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या भेटीला मुंबईला गेला. तेव्हा वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. हा त्यांच्या अक्षरशः पाया पडला आणि भावासाठी परीक्षा रद्द करून घेतली. धाकटा जावकपत्रांची नोंद करणारा कारकून म्हणून निवृत्त होईल एवढे स्पष्ट झाले.

दरम्यान निसर्गाने हस्तक्षेप केला. धाकट्याला लग्नाची जरूरी वाटू लागली. त्याची तिशी पार पडली होती. अंधाऱ्या समांतर प्रथेप्रमाणे तत्त्वतः शक्य असले तरी वेश्यागमन त्याच्या कुवतीबाहेर होते - वेश्या असतात कोठे? घरी न कळता तेथे जायचे कसे? खर्च? प्रथेप्रमाणे लग्न हा सर्वमान्य उपाय होता. त्याने ही गरज भावाच्या आणि वहिनीच्या कानावर घातली. आपले लग्न केव्हा होणार या विचाराने तो अस्वस्थ झाला होता. 'आता आमचा चार्म गेला!' असे उद्‌गार काढत असे. त्याबरोबरच स्त्रीदेहाचे आकर्षण अधूनमधून व्यक्त करत असे.

मग प्रथेप्रमाणे मुली बघणे सुरू झाले. तो दिसायला बरा होता, सरकारी नोकरी होती, भावाकडे राहात असे. वैयक्तिक शारीरिक स्वच्छतेत तो अतिशय गलिच्छ असे. स्वच्छता हा धर्माचा भाग नसणे हेही प्रथेप्रमाणेच. त्यामुळे त्याला सतत त्वचाविकार होत; पण हे बाहेरून दिसत नसे. म्हणजे 'स्थळ' म्हणून हे ठीक होते. यथावकाश लग्न जमले. मुलगी निम्न मध्यमवर्गातील होती. सरकारी नोकर होती. तिचे वडील एका सामान्य नोकरीतून निवृत्त झाले होते. त्यांना पाच मुले. थोरलीचे लग्न झाले होते. ती सुस्थळी होती. ही दुसरी मुलगी. तिसरा मुलगा नॉर्मल होता. आणखी धाकटे एक मुलगी आणि एक मुलगा यांची लग्ने होणे कठीण होते. त्या दोघांचीही बौद्धिक आणि शारीरिक वाढ खुंटलेली होती.

ते कुटुंब दापोडी या पुण्याच्या उपनगरात एका स्वस्त भाड्याच्या बैठ्या चाळीत राहात असे. तेथे चाळीसाठी एक टीव्ही लावण्यात आला होता. त्यावर आठवड्यातून दोन वेळा रात्री सिनेमा बघणे हा चाळकऱ्यांचा आवडता कार्यक्रम होता. ही मुलगी एकही सिनेमा चुकवायची नाही. राजेंद्रकुमार, जॉय मुखर्जी तिचे आवडते नट होते. दिल एक मंदिर, धूल का फूल अशा सिनेमांतील गाणी तिला पाठ असत. नवरा संपूर्ण कलाक्षेत्राविषयी अनभिज्ञ होता, त्यात सिनेमाही आला. दोघेही भावाच्या घरी येणारा रोजचा पेपरही कधीच वाचत नसत, शून्य सामाजिक जाण हा

त्यांच्यातील समान धागा होता.

यथावकाश त्यांचे लग्न झाले. धाकटा जरा जबाबदारीने नोकरी करू लागला. म्हणजे रोजच्या रोज नोकरीवर हजर तरी राहू लागला. लग्नानंतर देवदर्शन कमी झाले. पण तो घरात त्या वेळात जमिनीवर मांडी घालून मान डोलवत बसून राहात असे. ते एकदोन तास नजर रिकामी असे किंवा डोळे बंद असत. 'ध्यान' म्हणा.

यथावकाश त्यांना अपत्यप्राप्ती झाली. कुटुंब त्याने बायकोवर सोडले होते. त्याला दैनंदिन कौटुंबिक जीवनातील कोणत्याही कामात रस नसे. केर काढणे, फरशी पुसणे, भांडी घासणे व ती जागेवर लावणे, कपडे धुणे, स्वयंपाक सोडाच - त्यात मदत करणे, भाज्या चिरणे, किराणा आणणे, घरासाठी किमान खरेदी करणे या उपचारात त्याचा सहभाग शून्य असे. मुले वाढवणे, त्यांचे शिक्षण,आजारपणे इत्यादीही त्याच्या कक्षेबाहेर असत. हा त्याच्या लग्नाआधीच्या 'योग' काळाचा प्रभाव.

ही सून प्रथेप्रमाणे अर्थातच त्याच्या आईची आवडती होती. मध्यंतरी आई राहात असे त्या गावी तिच्या घरी काही धार्मिक कार्यक्रम होता. त्याला हा हजर राहू शकला नाही. त्याच्या आठवणीने कार्यक्रमात बायकोला रडू येऊ लागले. याचे त्याच्या आईला प्रथेप्रमाणे अतिशय कौतुक वाटले. तिनेही प्रथेप्रमाणे चार टिपे गाळली.

यथावकाश थोरल्या भावाकडे राहाणे सोडून त्यांनी दापोडीतील तिच्या आई-वडिलांच्या चाळीत दोन खोल्या भाड्याने घेतल्या. त्यामुळे भावाकडे येणारा पेपरही बंद झाला. यथावकाश तिच्या धाकट्या भावाने स्वतःचा एक छोटा बंगला बांधला आणि त्यातला काही भाग यांना दिला. यथावकाश थोरला भाऊ गेला.

एक अर्धविरक्त उदासीन पुरुष आणि कर्तव्यबुद्धीने संसार करणारी स्त्री असा त्यांचा संसार चालू राहिला. लौकिक दृष्टीने आधी भाऊ, मग बायको यांनी त्याचा चरितार्थ चालवला. यथावकाश दोन्ही मुलांची लग्ने झाली. तीही त्याच्या साडूने जमवली. मुलीला मुलगा झाला, मुलगा निःसंतान राहिला. यथावकाश नवरा-बायको दोघेही निवृत्त झाले व पेन्शनवर जगू लागले.

यथावकाश त्याचा अंतकाळ जवळ आला. शेवटचे दोन दिवस त्याला भास होऊ लागले. मुलगा व सून आजूबाजूला होते. गेलेला थोरला भाऊ त्याला दिसू लागला. त्याला 'नमस्कार करा' असे तो मुलाला आणि सुनेला आग्रहाने सांगू लागला व त्याने प्राण सोडला.

- ते मोठे कुटुंब पुण्याजवळच्या एका गावात राहात असे. पाच भाऊ आणि एक मधली बहीण. वडील जुन्या जमान्यातील मोठे बांधकाम व्यावसायिक. तो सगळ्यात मोठा भाऊ. त्याला शिक्षणात रस नव्हता. त्या वेळची शालान्त परीक्षाही तो नापास होत राहिला. त्याचा धाकटा भाऊ त्याच्यापेक्षा दोन वर्षांनी लहान होता. दोघेही आडदांड होते. त्यांच्या मारामाऱ्या जीवघेण्या असत. ते हातात पाटा वरवंटा घेऊन छपरावर चढत व दुसऱ्याला पाटा फेकून मारणे असले खेळ करत! आई खालून 'अरे, अरे...' ओरडत असे.

तो छुटपुट उद्योग करू लागला. जेमतेम पैसेतरी मिळवतो आहे हे पाहून त्याच्या लग्नाचा निर्णय आई-वडिलांनी घेतला. एक स्थळ सांगून आले. मुलगी सुस्वरूप होती. हा तिला बघून वेडाच झाला! त्या तीन बहिणी कर्नाटकातून वडिलांनी लग्नासाठी महाराष्ट्रात आणल्या होत्या. ही थोरली. तिघीही दिसायला सुंदर. त्यामुळे लग्ने लगेच जमली.

काही काळात याला मुंबईला टाटा कंपनीत इलेक्ट्रिशियन म्हणून नोकरी मिळाली. त्याच्या वडिलांनी दूरदृष्टीने दादर स्टेशनसमोर एका वाडीत दीड खोली भाड्याने घेऊन ठेवली होती. तेथे नवविवाहित गेले. शिड्यांवरून, खांबावर चढून इलेक्ट्रिक वायरी दुरुस्त करणे हे त्याचे काम. अधिक कमाईसाठी तो लोकांच्या घरचे वायरिंग काम, मिक्सर, बॉयलर, पंखे दुरुस्त करणे हेही करत असे. मिळकत बरी होती. त्याचा त्याला जरा जास्तच अभिमान होता. भेटेल त्याला 'माझ्याकडे इतके लाख आहेत' असे तो आवर्जून नमूद करत असे. व्यवसायाला उपयोगी म्हणून त्याला गुजराथी भाषाही येत असे. पण इंग्रजी जेमतेम, नाहीच.

तो काटेकोरपणे एका संस्कृत वचनानुसार व्रतबद्ध वागे

- आहार, निद्रा, भय आणि मैथुन ही प्राणी आणि माणूस यातील समान स्थळे आहेत. धर्म माणसाला माणूस बनवतो. पैसा हा त्याचा धर्म होता.

प्रथेप्रमाणे त्याने एक मोठा लोखंडी हौद बांधून घेतला. त्याच्या ओळखीचे सगळे जण असेच त्यांच्या त्यांच्या हौदात राहात. हौदाच्या भिंती दहा मीटर जाड होत्या. उंची पाच मीटर. आत-बाहेर करायला दोन्ही बाजूंना एकेक शिडी होती. प्रत्येक भिंत आहार, निद्रा, वगैरे चार पाशवी गुणधर्मांची होती. पैसा या त्याच्या धर्माच्या उपासनेसाठी तो या शिड्या वापरे. एखादा ओळखीचा कधीतरी वरून डोकावे आणि कुतूहलाने 'या भिंतींबाहेरच्या जगाशी तुम्ही संबंध ठेवत नाही का?' असे विचारे. 'जगाशी संबंध ठेवल्याने पांडुरंग सदाशिव सानेने आत्महत्या केली.' असे उत्तर तो हौदातून देई.

यथावकाश त्यांना तीन मुले झाली.

पहिला मुलगा अतिशय देखणा होता. त्याला आई-वडिलांनी चांगल्या शाळेत घातला. यापलीकडे त्याचा तो व्यवस्थित शिकेल अशी त्यांची प्रथेप्रमाणे अपेक्षा होती. ते दोघेही अत्यल्पशिक्षित होते. त्यामुळे चांगल्या शाळेवर त्याची प्रगती सोडावी असा त्यांचा ग्रह होता. ते अपुरे असते हे त्यांच्या लक्षात आले नाही. त्यांच्याकडून प्रयत्न म्हणजे शाळेआधी त्याला जबरदस्तीने लवकर उठवून ते त्याला आवरायला लावत असत. अंघोळ झाल्यावर तो फक्त लंगोटात असताना बाप त्याला रोज लाथ घालून त्याच्याकडून सूर्यनमस्कार करवून घेई. मुलगा रडकुंडीला येई, हा प्रकार बरीच वर्षे सहन केल्यावर एकदा मुलाने बापाचा हात गच्च धरला, मारणे कायमचे थांबवले.

खालच्या दोन मुली व्यवस्थित शिकल्या. थोरला मुलगा व त्याच्याहून वर्षानेच लहान असलेली थोरली मुलगी हे दोघे शालान्त परीक्षा पास झाल्यावर त्यांच्या पुढच्या शिक्षणासाठी कुटुंबाने मुंबईहून पुण्याला येण्याचे ठरवले.

बांधकाम व्यावसायिक वडिलांचा पुण्याला एक वाडा होता. याने वडिलांशी करार करून कागदोपत्री वाडा विकत घेतला. पण काम सोपे नव्हते. वाड्यात तीन भाडेकरू होते. तीनही कुटुंबे. एक कुटुंब याच्या सख्ख्या बहिणीचे. एक खोली वडिलांनी स्वतःसाठी ठेवली होती. पैसा त्याच्या डोक्यात तेव्हाना गेला होता. बहिणीचे कुटुंब व एक भाडेकरू किमान नाराजी दर्शवून का होईना पण बाहेर गेले. उरलेल्या एका भाडेकरूला याने बरीच दमदाटी केली. घराचे छप्पर काढेन, अंगणात हिजडे नाचवेन, तेथे बोकड कापेन, वगैरे. (सगळी मंडळी सक्त शाकाहारी होती). त्या काळी सरकारी दुधाची दुकाने असत. ती सकाळी सहाला उघडत. त्या भाडेकरूची सून तेथे काम करत असे. हा तिला गाठण्यासाठी लवकर तेथे जाई आणि चार लोकांसमोर तमाशा करे. मुळात ते कुटुंब गरीब होते. पैशाने व स्वभावानेही. म्हातारे गृहस्थ पोस्टात आयुष्यभर नोकरी करून निवृत्त झालेले. त्यांची बायको गृहिणी. मुलगा दारूच्या आहारी गेलेला. सून दुधाच्या केंद्रात चार तास काम करे. त्यांना जायलाच जागा नव्हती. मग याची बहीण ज्या दोन खोल्यांत राहात असे, त्या त्याने यांना दिल्या. वडिलांची खोली त्यांच्यासाठी ठेवली आणि उरलेला वाडा ताब्यात घेतला. आधी बायको व मुले पुण्याला आली, मग निवृत्तीनंतर हा.

सांगायला हे स्थलांतर मुलांच्या शिक्षणासाठी होते. पण मुलाने याला तोंडघशी पाडले. तो कॉलेजात गेला पण वडिलांची प्रथा चालू ठेवून शिकला नाही. देखणा असल्याने अनेक मुली त्याच्यावर फिदा असत. लग्न करायचे तर याच्याशीच असा निर्धार असणारी एक मुलगी याचा पिच्छा सोडेना. ती यांच्या घरी याचा 'अभ्यास घ्यायला' म्हणून यायची. इतरांसामोर दोघे फुली-गोळा हा गहन खेळ कागदावर तासन् तास मनोभावे खेळत असत. मग वरच्या खोलीत जाऊन ती त्याचा 'अभ्यास' घेई! अशा 'अभ्यासा'ने तो पदवीधरही होऊ शकला नाही. हे शल्य आई-बापांना आयुष्यभर राहिले. यथावकाश त्यांचे लग्न झाले.

मुलाला नोकरी मिळणे कठीण होते. फक्त रूप आणि दिखाऊ दिमाख लोकांना प्रथमदर्शनी आवडले तरी नोकरीसाठी अपुरे होते. वडिलांच्या ओळखी इलेक्ट्रिशियन, प्लंबर, गवंडी, सुतार, ड्रायवर अशा व्यवसायांशी मर्यादित होत्या. त्याही जास्त करून मुंबईत, पुण्यात नाही. तशी नोकरी मिळाली असती तरी याला जमली नसती. शिवाय

भारतात नोकरी मिळवायची तर वशिला हा एकमेव महत्त्वाचा घटक असतो. बाकी जात, धर्म, वय, औपचारिक शिक्षण, अनुभव, रूप, उंची, शर्टचा आणि बुटांचा साइझ, केस पुरेसे असल्यास त्यांची ठेवण, वजन, कपडे, इंग्रजी बोलता येते का, चश्मा असल्यास त्याचा नंबर, दात सरळ आहेत का आणि त्यांत फटी नाहीत ना, शारीरिक विकार, अपंगत्व, लैंगिक कल, असल्यास एखादी ॲलर्जी, झाला असल्यास तुरुंगवास वगैरे गोष्टी अगदीच दुय्यम आणि केवळ अर्ज भरण्यासाठी असतात. गुणवत्ता हा निवडीचा एकमेव घटक अगदीच क्वचित असतो. त्यात याला ना शिक्षण, ना अनुभव ना कोणतेच विशेष कौशल्य.

मग तो आणि त्याचे समविचारी मित्र यांनी एक वर्कशॉप काढायचे ठरवले. हे मित्र त्याच्यासारखेच अत्यल्पशिक्षित पण बऱ्या घरातून आलेले आणि दिखाऊ होते. शिक्षणाने माणसाचे ओळखीचे वर्तुळ कसे ठरते याचे पहिले उदाहरण त्याचे वडील. प्रथेप्रमाणे याने ते चालू ठेवले. या उद्योगासाठी प्रत्येकाने आपल्या घरातून म्हणजे वडिलांकडून काही पैसे आणले. नव्या कंपनीच्या नावावर बराच खल केला. सहा पार्टनर्सच्या नावांची आद्याक्षरे जुळवणे इत्यादी. करायचे काय यावर किमान विचारही केला नाही. वर्कशॉप अस्तित्वातही आले नाही.

यथावकाश प्रथेप्रमाणे सासऱ्यांनी ओळखीच्या एका स्टील फॅक्टरीत याला नोकरी लावून दिली. ती त्याने इमानेइतबारे काही वर्षे केली; पण नंतर कंपनीच बंद पडली. निदान तो अनुभव गाठीशी असल्याने त्याला दक्षिण भारतात अशाच एका फॅक्टरीत नोकरी मिळाली. तेथे त्यांचा संसार हा सुखाचा ते अमृतात नहाले. कारण वडिलांच्या जाचापासून, त्या घरापासून सुटका झाली. पण यथावकाश तीही कंपनी बंद पडली आणि प्रथेप्रमाणे यांना परत वडिलांच्या आश्रयाला येण्याची वेळ आली. तेव्हा वडिलांनी ‘उंट घरात घेतला की कधीही बाहेर जात नाही’ या शब्दात त्यांचे स्वागत केले. सुनेबद्दल सासऱ्याचे मत ‘वळले तर सूत नाहीतर भूत’ असे होते. ते मत तो सार्वजनिक करत असे.

परत एकदा प्रथेप्रमाणे सासरेबुवांनी त्यांच्या दुसऱ्या एका जावयाच्या धंद्यात याला थोडी भागीदारी दिली. तो धंदा भरभराटीचा होता. मालकाला काही हा भागीदार होणे पसंत नव्हते. पण प्रथेप्रमाणे त्याला त्याच्या सासऱ्याच्या शब्दाबाहेर जाता येईना. यानेही नाखुशीने का होईना पण काहीतरी काम मिळाले म्हणून प्रथेप्रमाणे ते स्वीकारले.

अल्पशिक्षित स्त्रिया घरबसल्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे क्लासेस घेतात, या प्रथेप्रमाणे काही काळ त्याची बायकोही क्लासेस घेत असे. भारतात असे अनौपचारिक व्यवसाय सहज शक्य असतात. ब्रिटनसारख्या देशात अनेक सरकारी नोंदण्या, तुमची मुलाखत, जागेची पाहाणी इत्यादी सोपस्कार असतात. त्यात असे उपक्रम मंजूर झालेच नसते.

क्लासेस सोडा, पण सायरा बानूसारखा तिचा आयुष्यभर फक्त एककलमी कार्यक्रम राहिला - याच्याबद्दल तीव्र कामवासना. त्यामुळे तिला तो नोकरदार आहे का बेकार आहे, त्याचे वडील घालूनपाडून बोलतात इत्यादी गोष्टींची फिकीर नसे. तो कायम जवळ असणे महत्त्वाचे. म्हणजे तिला हवा तेव्हा त्याचा शारीरिक उपभोग घेता येईल. तिला लग्नानंतर अनेक वर्षांनी कॉलेजातील एक मुलगी (एव्हाना साठीची बाई) भेटली. तिने 'तो अजून तितकाच हँडसम आहे का' अशी चौकशी केल्याचे ही मोठ्या कौतुकाने सस्मित सांगत असे. त्याच्या शरीरापलीकडे अगदी उंबरठ्यापासून बाहेरचे शहर, आपला देश, अफगाणिस्तान, रशिया, चीन, अमेरिकेपर्यंत बरेच मोठे जग आहे, याबाबत ती अनभिज्ञ होती.

नवऱ्यालाही या कोणत्याच जागतिक घडामोडीत रस नसे. महत्त्वाचे म्हणजे आई-वडिलांनी पूर्वायुष्यात त्याला पूर्ण खच्ची केले होते. त्यामुळे ही आपल्याला सांभाळून असते याचेच त्याला अप्रूप होते आणि तो ती म्हणेल ते ऐकत असे.

त्याचा एक आवडता छंद म्हणजे तीव्र देहबुद्धी. ती त्याला वडिलांकडून आली. जरा कोठे शरीरात ठुस्स झाले की तातडीने तत्कालीन नावाजलेल्या कन्सल्टंटकडे धाव घेणे. बापाच्या काळात आजच्यासारखे पैशापायरी कन्सल्टंट उपलब्ध नसत म्हणून हा चांगला, तो चांगला अशा ऐकिवातील बोलीसल्ल्याने बाप धावपळ करे. उदाहरणर्थ एकदा टाचेला खाज सुटते म्हणून त्याला अशा

एका डॉक्टरने हिरड्यांची पेस्ट लाव असा सल्ला दिला. मग पाच किलो हिरडे आणून पेस्ट करण्यासाठी तो कुटत बसला. वर्तमान प्रथेप्रमाणे मुलगा कन्सल्टंटकडे जाई. जरा पुढे जाऊन त्याला एका दुखण्यासाठी चार-पाच डॉक्टर्स माहिती असत. तो आलटून पालटून एकेकाकडे जाई. सर्दीसाठी चार-पाच, खोकल्यासाठी चार-पाच, खांद्यांसाठी चार-पाच, डोळ्यांसाठी चार-पाच, कानांसाठी चार-पाच, घोरण्यासाठी चार-पाच, दातांसाठी चार-पाच इत्यादी. शहरभरचे डॉक्टर्स त्याला माहिती असत. प्रथेप्रमाणे डॉक्टरांना असे पेशंट्स हवेच असतात. प्रथेप्रमाणे ते आवडीने व उत्साहाने नवे विकार त्याला बहाल करत आणि महागडी ट्रीटमेंट देत.

हृदयासाठी मात्र त्याने एकच डॉक्टर निश्चित केला. त्याला पाच-सहा वेळा हॉस्पिटलमध्ये भरती करून तो ठणठणीत बरा झाला असे त्यांनी प्रथेप्रमाणे छातीठोकपणे प्रत्येक वेळी जाहीर केले. त्याच्या प्रिय पत्नीला हार्ट ॲटॅक आल्यावरही त्याने तिला तेथेच दाखल केले.

परत मुख्य कुटुंबाकडे वळता, त्याच्यानंतरची मुलगी व्यवस्थित शिकली. ती भारतीय व्याख्येने 'काळी' (म्हणजे जरा गडद वर्णाची) असल्याने शाळा-कॉलेज-लग्नाच्या पहिल्या वर्षांपर्यंत आई-वडिलांची ती नावडती होती. त्यामुळेही असेल कदाचित पण तिने चिकाटीने शिक्षण पूर्ण केले, लग्नानंतर सासरच्या लोकांचा तसाच वर्णद्वेष आणि भारतीय प्रथेप्रमाणेचा इतर आडमुठेपणा सहन करत तिने पीएच.डी.ही मिळवली. विशेष म्हणजे इतके शिकूनही तिचे जग आई-वडील-भाऊ-बहीण यांच्यापुरतेच मर्यादित राहिले, मुलांच्या जन्मानंतर त्यांची या जगात भर पडली. हीही एक नवी प्रथाच. औपचारिक उच्च शिक्षणाने माणसांचा दृष्टिकोन विस्तृत होतोच असे नाही. किंबहुना नाहीच. कोणाशीही साधे बोलायचे असल्यास यांच्यापैकी एकाला ती त्यांत आग्रहाने खेचून आणे. भले बोलणे इस्राएल-हमास-हिजबुल्ला-येमेन किंवा कोणत्याही विषयावर असो. ती सख्ख्या कुटुंबीयांवर बोलण्यात तिचा सगळा वेळ घालवे.

आणखी एका प्रथेची ती निष्ठावंत अनुयायी होती. ऐकू येई तो वर्तमान शब्द उचलायचा आणि सारखा वापरायचा - ॲटिट्यूड, पंगा, फंडा वगैरे. या शब्दांचे आयुष्य एक-दोन आठवडे का असेना, तिला त्याने फरक पडत नसे. ती ते शब्द अतिशय आत्मीयतेने वापरे. एखाद्या वेळी इंग्लंड, अमेरिकेला जाऊन आलेलेही तिथले बोली वाक्प्रचार असेच वापरतात - हॅन्ड ऑन हार्ट, रिॲलिटी चेक, ॲट द एन्ड ऑफ द डे वगैरे. ती कॉलेजात शिकवत असल्याने तरुण मंडळींच्या सध्याच्या बोलीभाषेतून तिला हा पुरवठा अखंड असे. त्यामुळे तिची भाषाही मिळमिळीत, बेगडी आणि उथळ राहिली.

कोणाचेही तोंडदेखले अतोनात कौतुक करणे तिने आईकडून उचलले. सुरुवातीला माणूस त्यामुळे खूश पडे. अगदी फालतू गोष्ट सांगताना ती किती महत्त्वाची आहे हे ठसवण्यासाठी ती भुवया उंचावत असे. ही लकब वडिलांची.

धाकट्या मुलीने सुज्ञपणे रोटरी क्लबमध्ये दाखल होऊन लग्न जमवले.

निवृत्तीनंतर पुण्यात आल्यावर गावभर नात्यातल्या आणि जवळ-लांबच्या ओळखीच्या लोकांना भल्या पहाटे उठून भेटणे, प्रत्येकाला इतरांची अद्ययावत माहिती देणे हे त्याचे आवडते काम असे. या अपडेट्समध्ये पूर्वी त्याची अवहेलना केलेल्या लोकांना, ती काल्पनिक असली तरी, शिव्या देणे हाही महत्त्वाचा भाग असे. स्वतःचा आवाज ऐकायला आवडणाऱ्या लोकांपैकी तो होता. त्यामुळे बोलणे ही गरज होती.

भेटीत चहा तर प्रत्येक घरी मिळे, कोणी खायलाही देई. त्यावर तो दुष्काळातून आल्यासारखा तुटून पडे. आपले मनापासून स्वागत आहे का नाही या फंदात पडत नसे. पैसा या त्याच्या धर्मानुसार फक्त घेणे हा त्याचा नियम होता. चुकूनही त्याने कोणालाही चिमूटभर मीठही दिले नाही.

त्याची विनोदबुद्धी टॉयलेट ह्यूमर पुरती मर्यादित होती. त्यामुळे स्त्री-पुरुष कामक्रीडा, गुह्येंद्रिये व त्यांचे व्यवहार या संबंधित गोष्टींवर विनोद असत. अप्रस्तुत खाजगी माहिती तिऱ्हाइताला देणे अशीही त्याला सवय होती. एकदा एका कौटुंबिक कार्यक्रमात त्याने आपल्या भाच्याला 'मी पासष्ट वर्षांचा आहे पण माझा अजून उठतो' अशी

माहिती अनाहूतपणे अचानक दिली होती. हाच भाचा शालान्त परीक्षा चांगले मार्क मिळवून उत्तीर्ण झाला. तो याला नमस्कार करायला आला. हा कॉटवर कुशीवर पडलेला होता. स्वतःच्या मुलाचे अभ्यासाचे दिवाळे आठवून याने कूस बदलली व भाच्याकडे पाठ फिरवली.

मुलगी पीएच.डी. झाल्यापासून तो आणि त्याची बायको पापक्षालनाच्या मोहिमेवर होते. तिच्या पूर्वायुष्यात प्रथेप्रमाणे दुर्लक्ष केल्याची भरपाई प्रथेप्रमाणे ते आता करत असत. म्हणजे तिच्या घरी वारंवार जाऊन तिच्या मुलांची देखभाल करणे, स्वयंपाकाला मदत करणे, बाजारहाट करणे इत्यादी.

या पापक्षालनाचा सार्वजनिक भागही असे. त्यात तो भेटेल त्याला ती पीएच.डी. झाली, एका कॉलेजात लेक्चरर आहे हे दोन वाक्यात सांगता येणारे वर्णन अर्धा तास घालवून सांगत असे. त्याला डेस्टिनेशन मेमरीचा प्रॉब्लेमही होता. आपण कोणाला काय सांगितले आहे, हे लक्षात नसणे म्हणजे डेस्टिनेशन मेमरीचा अभाव. त्याला हा प्रॉब्लेम असल्याने तो तीच तीच गोष्ट त्याच माणसाला जेव्हाकेव्हा भेटेल तेव्हा परत परत सांगत असे.

उदाहरणार्थ, लांबच्या अप्रत्यक्ष ओळखीचे एक जण दादरला त्याच्या जवळ राहात. त्यांचे व याचे खाते एकाच बँकेत होते. त्यामुळे अधूनमधून ते तेथे एकमेकांना दिसत असत. हा दिसला की तो माणूस नजरभेट टाळत असे. पीएच.डी. मुलीची कहाणी परत एकदा ऐकायला लागणार या भीतीने पळून जात असे. त्याचे आपल्याला टाळणे यावर याने बरेच आकांडतांडव अनेकांशी बोलताना अनेक वेळा केले. 'हा समजतो कोण स्वतःला' वगैरे.

ओळखीच्या एकाची बायको दिसायला बरी होती. ती जरा नटूनथटून वावरे. तिने एका कार्यक्रमात याच्याकडे दुर्लक्ष केले असे याला वाटले. यावरही याने बरेच आकांडतांडव अनेकांशी बोलताना अनेक वेळा केले 'ही समजते कोण स्वतःला, पाच रुपयांत अशा बायका मिळतात.'

प्रथेप्रमाणे उतारवयात मरणाची भीती आली. प्रथेप्रमाणे तो काही महिने जपमाळ घेऊन जप करत असे! अशी मजा!

**– चन्द्रशेखर पुरन्दरे**

purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk

**मुक्त शब्दचे मित्र व्हा**
**कारण आजच्या बिकट**
**परिस्थितीत ते तुमच्याबरोबर**
**राहू इच्छिते.**